बातम्या,
लेख व
जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर
धाराशिव

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १७२ वा | मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## जिल्ह्यातील राष्ट्रीय लोकअदालतीत ८,३२५ प्रकरणांचा निकाल
## सात कोटीं रुपयांपेक्षा जास्त नुकसानभरपाईची तडजोड




धाराशिव (जिमाका) : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या निर्देशानुसार १३ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा न्यायालयात प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री.एस.सी.खटी यांच्या अध्यक्षतेखाली कामकाजास सुरुवात झाली.या वेळी न्यायमूर्ती श्री.एस. जी.ठुबे,श्री.आर. के.खोमणे,श्रीमती बी.के. पाटील,जिल्हा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष श्री.अमोल वरुडकर,जिल्हा शासकीय अभियोक्ता श्री.एम.बी. देशमुख यांच्यासह अन्य न्यायाधीश उपस्थित होते.

जिल्ह्यात एकूण ९ पॅनलमार्फत सुनावण्या घेण्यात आल्या. लोकअदालतीची वैशिष्ट्ये : कळंब न्यायालयात मोटार अपघात प्रकरण क्रमांक २९/२०२४ मध्ये तब्बल ९२ लाख रुपये नुकसानभरपाईची तडजोड झाली.

उस्मानाबाद पॅनल क्र. ०२ मध्ये तीन अपघात प्रकरणांत अनुक्रमे ५१ लाख, ३६ लाख व १७ लाख रुपये अशा एकूण १.०४ कोटी रुपयांची तडजोड झाली.उमरगा न्यायालयात मोटार अपघात प्रकरण क्रमांक १०/२०२३ मध्ये ४७ लाख रुपयांची तडजोड झाली.या लोकअदालतीत प्रलंबित ५६ हजार ६९२ व दावापूर्व २२ हजार ६१८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित ८४७ आणि दावापूर्व ७ हजार ४७८ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली.

प्रलंबित दिवाणी प्रकरणे – ४३८,मोटार अपघात/ कामगार नुकसानभरपाई – ३४३ प्रकरणे, वैवाहिक प्रकरणे – ०६,धनादेश प्रकरणे – ७५,बँक प्रकरणे – ६८, बँकेची वादपूर्व प्रकरणे – १३२, नगरपालिका व ग्रामपंचायतीचे पाणीपट्टी/ घरपट्टी वादपूर्व प्रकरणे – ६५३०,गुन्हा कबुलीची प्रकरणे – १६५ होती.मोटार अपघात व कामगार नुकसानभरपाई प्रकरणांतून पक्षकारांना एकूण ७ कोटी ४ लक्ष ९५ हजार रुपये मिळाले.धनादेश प्रकरणांत फिर्यादींना १ कोटी ४१ लक्ष ५९ हजार ९६३ रुपये वसूल करून देण्यात आले. दिवाणी प्रकरणांतून ६० लक्ष ३७ हजार ४७५ रुपये,बँक प्रकरणांतून ३ कोटी १७ लक्ष ४८० रुपये,बँकेच्या वादपूर्व प्रकरणांतून १ कोटी ७८ लक्ष ८५ हजार ८४२ रुपये,नगरपालिका/ ग्रामपंचायतीच्या प्रकरणांतून १ कोटी ४८ लक्ष ४६ हजार ७१३ रुपये,तर गुन्हा कबुली प्रकरणांतून ९४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

या लोकअदालतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आल्याने न्यायदान व्यवस्थेवरील ताण कमी झाला असून,पक्षकारांना दिलासा मिळाला आहे.

## दिवाळी फटाके तात्पुरते विक्री स्टॉल परवाना १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज मागविले

धाराशिव (जिमाका)– प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळी सणानिमित्त तात्पुरत्या फटाके विक्री स्टॉल परवानगीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.इच्छुकांनी आपले अर्ज १६ सप्टेंबर २०२५ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

परवानगीसाठी अर्ज करताना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.विहित नमुन्यातील अर्ज,फॉर्म ड्ए–५

ओळखपत्र (आधार कार्ड/पॅनकार्ड/मतदार ओळखपत्र इ.),संबंधित ग्रामपंचायत/नगरपरिषद,नगरपंचायत यांचे ना हरकत प्रमाणपत्र,साक्षांकित नकाशा (संबंधित स्थानिक संस्थेचा),जागा खाजगी असल्यास जागामालकाची ना हरकत व जागेची कागदपत्रे,संबंधित पोलीस स्टेशनचे ना हरकत प्रमाणपत्र,विहित परवाना शुल्क भरण्याचे चालान,पूर्ण कागदपत्रांसह आलेले प्रस्तावच स्वीकारले जाणार आहेत. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही,असे अपर जिल्हादंडाधिकारी श्रीमती शोभा जाधव यांनी कळविले आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)– भुम पोलीस ठाणे अंतर्गत अन्सार यांनी दि.१४.०९.२०२५ रोजी हाडोंग्री पाटीजवळ पार्डी रोड भुम येथे टाटा कंपनीचा ट्रक मध्ये गोवंशीय जातीचे जर्सी गायी वाहनासह एकुण ८,७५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जर्सी गाय त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(ड) (इ) (ई) (ऐ) (ठ) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(ब), ९, ९ (अ) सह मोवाका कलम ६६/१९२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## क्राईम न्युज
### अनेक ठिकाणी अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)– लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत विशाल रा. वेमुलवाडा ता. जि. राजन्ना सिरसिल्ला राज्य तेलंगणा ह.मु. वडगाव गांजा ता.लोहारा जि. धाराशिव हे दि.१४.०९.२०२५ रोजी वडगाव गांजा येथे अंदाजे ८०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर हब्बु रा. पुर्व जेवळी ता. ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.१४.०९.२०२५ रोजी पुर्व जेवळी तांडा येथे अंदाजे १,४०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत पवन सु रा. नायगाव ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१४.०९.२०२५ रोजी नायगाव ते बोरगाव रोडलगत हॉटेल न्यु अर्जुनच्या समोरील बाजूस मोकळ्या जागेत अंदाजे ५९५ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १७ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत भगवान रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१४.०९.२०२५ रोजी माडज शिवारातील गुगळगाव ते वागदरी जाणारे रोडलगत सुरेश फुगटे यांचे शेताजवळ अंदाजे १,८०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे: अंतर्गत शितल रा. खडकी रोड डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१४.०९.२०२५ रोजी डिकसळ शिवारातील डिकसळ ते ,खडकी जाणारे रोडलगत अंदाजे २०,००० किंमतीची ४०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव व ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे..

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेची ऑक्टोबर महिन्याची ऑनलाईन नोंदणी सुरु

धाराशिव (जिमाका)–महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची ऑक्टोबर–२०२५ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली असून,भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी. असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे. महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक,तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूरला येतात.श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून,तिच्या नोंदणीसाठी http://shrituljabhavanitempletrust.org या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर जाऊन नोंदणी करता येईल.

नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.नोंदणी कालावधी : २० सप्टेंबर २०२५ सकाळी १० वाजता ते २५ सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंत.प्रथम सोडत : २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. प्रथम फेरीचे ऑनलाईन पेमेंट २७ सप्टेंबर सकाळी ११ ते २८ सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंत राहील.

व्दितीय सोडत : २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता.व्दितीय फेरीचे पेमेंट : २८ मे सकाळी ११ ते २९ सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंत.तृतीय सोडत २९ मे रोजी सकाळी ११ वाजता. तृतीय फेरीचे पेमेंट : २९ सप्टेंबर सकाळी ११ ते ३० सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंत. अंतीम यादी प्रसिद्धी: ३० सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहणार आहे.

शारदीय नवरात्र महोत्सवात श्री देविजींची मंचकी निद्रा असल्याने दि.२ ते ६ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत सिंहासन पुजा बंद राहतील.

सर्व भाविक भक्त,महंत,पुजारी,सेवेकरी आणि नागरिकांनी वरीलप्रमाणे सिंहासन पूजेच्या नोंदणीची माहिती लक्षात घेऊन वेळेत नोंदणी करावी,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

## पोदार प्रेप् धाराशिव येथे कोडींग ऑलिपियाड




धाराशिव (रामेश्वर डोंगरे)– ाराशिव येथे २ दिवसीय 'कोडिंग ऑलिंपियाड' घेण्यात आले, जो मुलांना कोडिंगच्या मूलभूत गोष्टी शिकवतो आणि त्यांना सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि तर्कशुद्ध विचार शिकवतो. या कार्यक्रमामुळे मुलांचा मानसिक विकास होतो आणि त्यांची विचारशक्ती वाढते. आजच्या डिजिटल युगात कोडिंग एक महत्त्वाची कौशल्य आहे, जी मुलांना भविष्यात विविध करियर संधी देऊ शकते. हा कार्यक्रम पोदार शाळेतील विद्यार्थ्यांसोबत इतर शाळेतील मुलांसाठी देखील होता. पोदार शाळेचा उद्देश प्रत्येक मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वो त्तम शिक्षण देणे हाच् आहे. आणि पोदार शाळा नेहमीच अश्या प्रकारचे उपक्रम आयोजित करत असते. या कोडिंग ऑलिंपियाडमध्ये सर्व सहभागी विद्यार्थ्यांना 'ॲप्रिसिएशन सर्टिफिकेट' देऊन गौरविण्यात आले.

## डॉ. रामलिंग पुराणे पुन्हा बसले खड्ड्यात, राष्ट्रीय महामार्गाची दयनीय अवस्था



गुत्तेदार आणि प्रशासनानी जनाची नाहीतर नाही मनाची तरी लाज बाळगून रकडलेला रस्ता काम व ठीक ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्त करावे अन्यथा त्याच ठिकाणी शड्डू ठोकून आंदोलने छेडण्यात येईल...
डॉ. रामलिंग पुराणे,
अध्यक्ष, बसव प्रतिष्ठान

**बसव प्रतिष्ठानच आंदोलनाचा इशारा..**

मुरूम (प्रतिनिधी)– मुरूम ते अक्कलकोट जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ब ची दयनीय अवस्था झाली आहे, २०२३ मध्ये या रस्त्याचे काम एका बड्या गुत्तेदारानी केले होते, आज रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत, या मार्गावरील आलूर ते बोळेगाव या रस्त्यावरील १ किलो मिटर रस्ता काम शेतकऱ्यांनी मावेजा साठी अडवला होता, मात्र त्यासंदर्भात निकाल लागून ६ महिने झाले अद्याप रस्ता काम झाला नाही, दि. १५ वार सोमवार रोजी बसव प्रतिष्ठान अध्यक्ष तथा समाजसेवक डॉ. रामलिंग पुराणे यांनी रस्त्यावर पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून लाक्षणिक आंदोलन करून संबंधित गुत्तेदार व प्रशासनाला एक महिन्यात रस्त्या बाबतच्या समस्या सोडवावे अन्यथा बसव प्रतिष्ठान च्या माध्यमातून आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

मुरूम ते अक्कलकोट रस्त्यावर खड्डे व पाणी साचल्याने रहदारीस अडथळा. आलूर ते बोळेगाव रस्ता २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी मावेजा न मिळाल्याने आवडल्यामुळे अर्धवट सोडण्यात आले होते. दोन वर्षांपासून या रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्यावरुन प्रवास करणे जिकीरीचे झाले आहे. उमरगा अक्कलकोट रस्ता भाविक व प्रवाशांना सोयीचा होता पण शेतकऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे परिसरातील नागरिकांनी याचा प्रचंड त्रास सोसावा लागत आहे.

प्रशासनाकडे वारंवार ग्रामपंचायत व बोळेगाव येथिल नागरीकांनी पाठपुरावा करून देखील याची दखल घेतली नाही. कोर्टातसुद्धा याचा निकाल लागला असुन अजुनपर्यंत याकडे दुर्लक्ष केले जात आहे.यावर्षी आलुर येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने या रस्त्याची पार वाट लागली आहे,या रस्त्यावरील पुल फुटुन गेल्यामुळे रस्त्यावरुन पाणी वहात आहे,रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून गाड्यांचे अपघात होत आहेत, तरी सुद्धा प्रशासनाचे याकडे लक्ष नसल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास भोगावा लागत आहे.

लवकरात लवकर या रस्त्याची शासनदरबारी दखल घेऊन प्रवाशांची गैरसोय दुर करावी अशी मागणी नागरिकांतूनही होत आहे.

## दिलीप कांबळे यांची मराठवाडा प्रदेश सह सचिव पदी निवड

धाराशिव (प्रतिनिधी) :–सामाजिक व साहित्य क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेत धाराशिवचे साहित्यिक दिलीप परशुराम कांबळे यांची मराठवाडा प्रदेश सह सचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत राहणार आहे.

शुभांगीताई काळभोर (राष्ट्रीय उपाध्यक्ष) व डॉ. शरद गोरे (राष्ट्रीय अध्यक्ष) यांच्या हस्ते ही निवड जाहीर करण्यात आली.

परिषदेच्या वतीने कांबळे यांच्याकडून समाजातील सर्व घटकांपर्यंत साहित्य चळवळ पोहचवण्याची व समानतेचा संदेश रुजवण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दिलीप कांबळे यांनी १९७७ पासून लेखनास सुरुवात केली असून विविध नामांकित वृत्तपत्रांमध्ये त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच अनेक प्रतिष्ठित दिवाळी अंकांमध्ये त्यांचे साहित्य झळकले आहे विशेषतः ग्रामीण कथालेखनात त्यांचा हातखंडा आहे.



या निवडीमुळे मराठवाड्यातील साहित्यिक व सामाजिक वर्तुळात आनंद व्यक्त केला जात असून, कांबळे यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जीवंत असल्याचे लक्षण आहे का?

राष्ट्र किंवा देश म्हणजे त्या देशातील जनता समजली जाते. मुळात बऱ्याच वेळा जीवंत राष्ट्र असा शब्द प्रयोग होतो. जीवंत राष्ट्र म्हणजे त्या देशातील राष्ट्र किंवा देशप्रेमी जनता समजली जाते. आपल्या देशाबाबत कोणी वाईट बोलले किंवा ईजा पोंहचेल असे बोलले तर तळ पायाची आग मस्तकाला गेली पाहिजे. अशी वृत्ती भारतीयात होती. ती केंव्हा होती तर देश स्वातंत्र्यापुर्वी! सर्व जाती, धर्म, मत, पंथ एक एकोप्याने राष्ट्राविषयी काम करीत होती. देश स्वतंत्र झाला व देशाची सुत्री ज्यांच्या हाती पहिल्यांदा केली त्यांनी जागृत राहून कार्य केले असते तर निश्चित पुर्वी सारखी राष्ट्रप्रेमाची माणसे असली असती. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रप्रेम कमी होत गेले व देशातील जनता भ्रष्टाचाराच्या माध्यमातून आपल्याच लोकांना लुटण्याचे काम करू लागली. आपणच आपल्याला लुटले जाऊ लागल्याने द्वेश भावना निर्माण झाली. त्यात स्वार्थी मंडळींनी जातीच्या आडून एकमेकांच्यामनात विष पेरण्याचे काम केले. राजकिय आपली स्वार्थाची पोळी भाजून घेण्याचे काम होऊ लागेल. त्यामुळे वरचेवर दुफळी निर्माण होऊ लागली. स्वातंत्र्यापुर्वी असे नव्हते व नंतर का बनले यावर चिंतन केले तर अनेक बाबी कळून येतील. भारताचा इतिहासात पाहिला तर गांधी टोपी धुऊन दुसऱ्यादिवशी वापरणारे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री होऊन गेले. देशात दुष्काळ पडला म्हणून एकवेळेच भोजन करणारे पंतप्रधान होऊन गेले. जे देशाचे सर्वोकृष्ट व उच्च पद भुषविणारे राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या निधनानंतर बँकेत किती बॅलेंस होते. त्यांनी किती धनसंपत्ती जमवली होती. हे सर्वांना माहिती आहे. एकीकडे भारतात राष्ट्रप्रेमी मंडळी व दुसरी कडे देश लुटणारी मंडळी दिसून येते. त्यामुळे वाईट वाटण्याशिवाय दुसरे काहीच दिसून येत नाही. बोटावर मोजण्याइतकी चांगली मंडळी व भरमसाठी चुकीच्या मार्गाने चालणारी मंडळी पाहिली तर आपल्या पुर्वजांनी यासाठीच स्वराज्य मिळऊन दिले का? असा विचार मनात येतो. आज शेजारी राष्ट्राने म्हणजे पाकिस्ताने भारतीय हद्दीतील पहलगाम मध्ये शिरून भारतीयांचे नाव विचारून, जात विचारून गोळ्या घातल्या अशा घातक राष्ट्राबरोबर संबंध का ठेवले जातात हेच कळून येत नाही. पाकिस्तानी नागरिकांना देशात थारा का दिला जातो? आज बांगलादेशी असोत किंवा पाकिस्तानी असतोत जी चुक महात्माजींनी केली त्याची पुर्नरावृत्ती करणे योग्य आहे का? याबाबत चिंतन का होत नाही. खेळ खेळले गेले. गरज होती का? नसते खेळले असते तर कांही बिघडले असते का? मुळात पुर्वजांनी देश स्वतंत्र झाल्यावर ज्या चुका झाल्या ती चुक पुन्हा होता कामा नये. आज देशातील बहुसंख्य नागरिकांचे देशावर प्रेम कमी असल्याने भ्रष्टाचार वाढला आहे. भ्रष्टाचार का वाढला वर चिंतन किंवा उपायोजना होत नाही. वरचेवर मतासाठी आज पर्यंत चालत आले आहे तेच होत असेल. फरक मात्र एवढा आहे पुर्वीपेक्षा प्रमाण कमी आहे. बाकी फारसा फरक दिसून येत नाही. युपीए दोनच्यावेळी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार उघडा पडल्याने सत्तापरिवर्तन झाले. ही चुक कोणाची होती. युपीएची होती. नुकतेच कर्नाटकात बंगलूर मेट्राचे स्थानकाचे छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव बदलुन 'सेंट मेरी' घोषीत करण्यात सिद्धरामय्याला काय गरज होती. मुळात चांगली विचारकरणारी मंडळी जर नको त्या बाबीत हात घालत असेल तर दुषीत वातावरण निर्माण होऊ शकते. समाजात तेढ निर्माण करणाऱ्याबाबी घडविल्या जातात. हे आता नागरिकांनी विचार केला पाहिजे. आज जपान, जर्मन किंवा चीन भारतापेक्षा पुढे का आहेत याचा विचार केला जात नाही. भारतात जातीवाद वाढत आहे. अनेक बाबी चिंताजनक बनत आहेत. ठराविकांनी डोके वर काढले आहे. कोणतेही सरकार आले तरी सत्तर वर्षात राष्ट्रप्रेम जागृत करू शकले नाहीत. राष्ट्रप्रेम निर्माण करावे लागते ही बाब बाजारात मिळत नाही हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटीशांनी दिडशे वर्ष राज्य केले. त्यानंतर देशात उठाव झाला. या देशाल अहिंसेच्यामार्गाने स्वराज्य मिळाले हे आजही शिकवले जाते. स्वातंत्र्यासाठी रक्ताच्या नद्या वाहिल्या आहेत. अनेकांचे सिंदुर मिटले आहे. महिलांची छाती कापून शेजाराच्या देशातून रेल्वे आल्या. हे विसरले जात आहे. खरा इतिहास न शिकविल्याचा परिणाम आहे. अहिंसेने कांही साध्य झाले नाही. अनेकांना फासावर लटकावले हे अहिंसचे प्रतिक आहे का? देशातील नागरिकांनी विचार करावा या देशाला फुकट स्वराज्य मिळाले नाही. देश चांगला करण्यासाठी शास्त्रीजी सारखा नेता गमवावा लागला. स्वार्थी मंडळी त्या काळात कमी होत्या आज त्यांची संख्या देशभर वाढल्याची दिसून येत आहे. आसाम, मनीपूर, प. बंगाल आदि ठिकाणाची स्थितीचा अभ्यास करावा. कर्नाटकात काय चालले आहे याचे सखोल ज्ञान घ्यावे. पुन्हा काही विपरीत घडते की काय असे वाटायाला लागले आहे. त्यामुळे विचार केला पाहिजे. अजूनही वेळ गेलेली नाही, परिस्थिती सुधारू शकतोत. आज अमेरिका हा वरचढ ठरत आहे. नको ते निर्बंध लावले जात आहेत. भारताची निर्यात वाढली पाहिजे. भारतीय उद्योगांना चालना मिळाली पाहिजे. भारताला शेजारी राष्ट्र निट खाऊ देणार नाहीत. त्यांना साथ देणारे आपल्याच देशातील लपून काम करणारे कमी नाहीत. ते शोधले तर सापडतील? त्यामुळे वेळीच विचार केला पाहिजे. नसता वर-वर समाधान वाटणारी बाब आहे. चौदा वर्षात केंद्रात बदलामुळे काही तरी चांगले दिसून येत आहे. फार काही चांगले नाही तरी बरा परिणाम दिसून येतो. कारण राममंदीराची उभारणी असो किंवा जम्मूकाश्मीरातील कलम हटविणे असो. जे अशक्य बाबी होत्या त्या काही प्रमाणात शक्य झाल्या आहेत. एवढ्यावर समाधान होणारे नाही. बरेच काही केले पाहिजे. देश आंतर्गत पोखरला जात आहे की काय असे वाटत आहे. देशात बॉम्बस्फोट समाप्त झाले तरी वाईटांनासाथ देणारी या देशातील मंडळी आहे. त्यांचा शोध घेतला पाहिजे. तरच आपल्या देशातील नागरिक जिवंत वाटण्यासारखे काम होणे अपेक्षित आहे.

# अहमदपूरात लवकरच १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारणार - सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी :** शहरात उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून लवकरच १०० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय उभारणार असून याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे शहरातील ०४ कोटी २० लक्ष रुपयाच्या विविध विकास कामाच्या भूमिपूजना प्रसंगी सहकार मंत्री नामदार पाटील बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मंजुषाताई लटपटे होत्या.

मुख्याधिकारी संतोष लोमटे, प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल जहागीरदार, उपाभियंता गोविंद भोसले, माजी सभापती ॲड. टी.एन कांबळे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, शहराध्यक्ष अझहरभाई बागवान, शिवाजीराव खांडेकर, यशवंत केंद्रे, तानाजी राजे, सुंदरराव साखरे, निखिल कासनाळे, अमित रेड्डी, माधव पवार, आबासाहेब देशमुख, गंगाधर अक्कानवरू, शिवाजीराव पाटील अंधोरीकर, मोहन पाटील, निवृत्तीराव कांबळे, सुशांत गुनाले, बाळासाहेब लखनगिरे, अश्विनीताई कासनाळे, शेख अय्याजभाई, गोपाळराव कानवटे, डि.के जाधव, बालासाहेब पाटील आंबेगावकर, शार्दुल शेख, अभय मिरकले, फुजल जहागीरदार, गणेश मुस्तापुरे, बाबुभाई रुईकर, सादिक शेख, धर्मपाल मामा गायकवाड, एन.डी. राठोड, हुसेन भाई मनियार, बाळू रेड्डी, कदम सर, इनुसभाई गोलंदाज, गंगाधर ताडमे, अशोकराव चापटे सर, रहीम खान पठाण, दिलदार शेख, कुलदीप मद्देवाड, रामराव खिडसे, सुप्रिया भालेराव, बाळासाहेब बेदडे, जावेद बागवान, प्रशांत भोसले, चंद्रकांत गंगथडे, चंद्रशेखर भालेराव, श्रीकांत मजगे, गजानन परांडे, प्रदीप मुन्ना कांबळे, आशिष तोगरे, प्रकाश ससाने, एजाज भाई सय्यद, शेख जिलानी, फिरोज शेख, महेश हंबीर, व्यंकटराव वगे, सय्यद इलियास, इलाही बागवान, शार्दुल शेख फारूक मणियार, अशोक सोनकांबळे, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की, आपण सर्वांनी मतदार संघाची जबाबदारी माझ्यावर टाकली असून मतदारसंघाचा चौफेर विकास मी करणार आहे. आगामी काळात अनेक नवीन काम सुरू होणार असून, दोन वर्षात अहमदपूर शहरातील अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागणार आहेत. शहरातील पाणीपुरवठा, नगरपालिकेसाठी सोलर योजना, शॉपिंग कॉम्प्लेक्स या सर्व विकास कामासाठी निधीची तरतूद करण्यात आली असून ही सर्व विकास कामे लवकरच मार्गी लागणार असल्याचे नामदार पाटील म्हणाले.

शहराबरोबर तालुक्याचा सुद्धा विकास मोठ्या प्रमाणात या ठिकाणी होत असून, अनेक प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम प्रगती पथावर आहे. अनेक गावात पाणीपुरवठाची प्रकल्प सुद्धा अंतिम टप्प्यात असून मतदारसंघ पाणीदार बनवण्याकडे माझे लक्ष असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले.

मतदारसंघात भविष्यात दोन नवीन कारखान्याच्या माध्यमातून अनेक तरुणांना रोजगार देण्याचा माझा मानस असून मतदारसंघासाठी पाणीदार असलेली अंतेश्वर बंधाऱ्याची लवकरच प्रशासकीय मान्यता शासन प्रदान करणार आहे. तालुक्यात भविष्यात १०० कोटीची मी पूल बांधकाम करणार असून या सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी करणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी विरोधकांचा समाचार घेतला यात त्यांनी विरोधकांना फक्त टीका करणे एवढे जमते त्यांना कधीही विकास काम जमले नाही. शहराच्या नागरिकांनी विकास कामासोबत यावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे तालुकाध्यक्ष अमित रेड्डी यांनी केले. यावेळी अभय मिरकले, शिवाजी खांडेकर,शिवानंद हेंगणे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव माने, संभाजी चोपणे यांनी केले तर आभार चंद्रशेखर भालेराव यांनी मानले.

# लाहोटी स्कूलमध्ये हिंदी दिवस साजरा; विद्यार्थ्यांनी केले कविता, गीतांचे सादरीकरण



**लातूर/प्रतिनिधी :** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू तर प्रमुख अतिथी म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालयातील हिंदी विभागातील प्रा. डॉ. पल्लवी भुदेव पाटील यांची उपस्थिती होती.

हिंदी दिनाचे औचित्य साधून स्कूलमध्ये हिंदी विभागाद्वारे काव्य वाचन, निबंध लेखन, कथा लेखन, भाषण, सुंदर हस्ताक्षर आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विविधता मध्ये एकता व स्वातंत्र्य लढ्यात हिंदी साहित्याचे योगदान यावर आधारित प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

तनिष्का स्वामी, प्रीत भुतडा, ओजल पडिले, संध्याराणी सडोले या विद्यार्थिनींनी मिले सुर मेरा तुम्हारा या गीतावर नृत्य सादरीकरण केले. श्रुती गायकवाड, मर्जिया उस्ताद, भक्ती वर्मा, अनुष्का बिराजदार, प्रेरणा सुडे, सिद्धी यांनी स्वरचित कवितांचे वाचन केले. रिदम पाटील हिने मै नही माखन खायो हे सूरदासजीचे भजन गायले. गायनाला वीरनाथ डोंगरे (तबला), आरुष राजुरे (हार्मोनियम) यांनी साथ दिली. आर्या मुंडे हिने हिंदी दिनाबद्दल आपले विचार मांडले

हिंदी भाषेमुळे माध्यम, भाषांतर, ऑनलाइन शिक्षण, प्रकाशन, जनसंपर्क कंपन्या, तांत्रिक व इतर अनेक क्षेत्रामध्ये रोजगारांच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन प्रमुख अतिथी प्रा. डॉ. पल्लवी भुदेव पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. प्रास्ताविक वर्षा खुंटेगावे यांनी तर सूत्रसंचलन संध्या सोमाणी व आनंदी गोजमगुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्षा खुंटेगावे, सरिता खंडेलवाल, माधुरी भोसले, प्रियंका लोखंडे, सुप्रिया मिश्रा, सुनिता बरगले आदींनी सहकार्य केले.

# आयुक्तांनी केली गोडाऊनची पाहणी; सिंगल युज प्लास्टिकचा १ टन साठा जप्त केला



**लातूर/प्रतिनिधी :**शनिवार दिनांक १३.०९.२०२५ रोजी आयुक्त श्रीमती मानसी व उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी हत्ते नगर येथील एका सिंगल युज प्लास्टिक गोडाऊनची पाहणी करून सिंगल युज प्लास्टिकचा जवळपास १ टनचा साठा जप्त केला करण्यात आला. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख साहेब, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे,धोंडीराम सोनवणे,शिवराज शिंदे,अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदिप गायकवाड,अमजद शेख व कर्मचारी उपस्थीत होते

शहरात सिंगल युज प्लास्टिक वापरास बंदी आहे.असे असतानाही काही व्यावसायिक व नागरिकांकडून हे प्लास्टिक वापरले जाते. पालिकेने गेल्या काही दिवसांपासून प्लास्टिक जप्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे संबंधितांना आर्थिक दंडही केला जात आहे.

प्लास्टिकचा वापर वाढत आहे. व्यावसायिक आणि नागरिकांनी पर्यावरण रक्षणासाठी या प्लास्टिकचा वापर बंद करावा,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिक व व्यावसायिकांनी प्लास्टिक वापर बंद केला नाही तर पालिकेची ही मोहीम यापुढेही सुरूच राहणार असून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेकडून देण्यात आला आहे.

## द्वारकादास शामकुमार परिवाराच्यावतीने आयोजित गुरुजनांचा सन्मान सोहळा उत्साहात

# शिक्षकांनी चौकटीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडविण्याचा प्रयत्न करावा : प्रा. गणेश शिंदे

**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षकांनी अभ्यासक्रमाच्या चौकटीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करून त्यांचे उज्वल भवितव्य घडविण्याचा प्रयत्न करावा,असे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते तथा प्रबोधनकार प्रा. गणेश शिंदे यांनी केले. आपल्या ओघवत्या शैलीतील निरुपणाने प्रा. शिंदे यांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध करून सोडले. द्वारकादास शामकुमार परिवार आणि तुकाराम पाटील मित्रमंडळाच्या वतीने लातूरच्या दयानंद सभागृहात आयोजित गुरुजनांच्या सन्मान सोहळ्यात प्रा. शिंदे उपस्थित गुरुजनांना मार्गदर्शन करत होते.

या सोहळ्यास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, कलर्स मराठी - वाहिनीवरील सूर नवा ध्यास नवा या कार्यक्रमाच्या विजेत्या सौ. सन्मिता धापटे - शिंदे, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त देवशटवार, द्वारकादास शामकुमारचे संचालक तुकाराम पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, रमेश बिरादार, बाबुराव जाधव, प्रकाश देशमुख, चिताडे, राजाभाऊ पाटील, संभाजी नवघरे, डॉ. राम बोरगावकर, प्राचार्य निलेश राजेमाने, सदाशिव पाटील, ज्ञानेश्वर जाधव, शशिकांत पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात मोगरा फुलला या भक्तिगीतांचा कार्यक्रम सौ. सन्मिता शिंदे यांनी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. ज्येष्ठ निरुपणकार प्रा. गणेश शिंदे यांनी आपल्या निरूपणात ज्ञानेश्वरीतील अनेक प्रसंग उपस्थितांच्या डोळ्यांसमोर उभे करण्याचे काम केले. समाज जीवनात वावरत असताना आपण काय बोलतोय याचे भान राखून चालणे अतिशय आवश्यक असते. बोलताना भाषा, शब्द जपून वापरणे गरजेचे आहे. महाभारत घडण्याची अनेक कारणे असतील, पण द्रौपदीच्या शस्त्रबाणांनी दुर्योधन दुखावला. द्रौपदीने दुर्योधनाबद्दल कटू शब्द काढले नसते तर कदाचित महाभारत घडलेही नसते असे सांगून प्रा. शिंदे पुढे म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांनी गीता सोप्या भाषेत समजावून सांगण्याचे काम केले. ज्ञानोबा आणि तुकोबा बंड पुकारून चालणारे संत होते. ते कोणाच्याही हो मध्ये हो मिसळून चालत नसत. त्याप्रमाणे शिक्षकांनीही हो मध्ये हो मिसळून चालू नये. विद्यार्थ्यांनी केवळ डॉक्टर - इंजिनिअरिंगच्या मागे न धावता विविधांगी क्षेत्रात आपले नैपुण्य दाखविण्याचा प्रयत्न करावा.

करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याचे काम शिक्षकांनी करावे. विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे तयार करावे. शिक्षकांचे अधिष्ठान खूप महत्वाचे असते. आज साधने वाढली, पण आनंद - समाधान हरवत चालल्याचे पाहायला मिळते. तंत्रज्ञानात कितीही बदल एआय येऊ द्या , काही झाले तरी शिक्षकांचे महत्व कधीच कमी होणार नाही,असेही त्यांनी निक्षून सांगितले. गरीब - श्रीमंतांमधील दरी न वाढू देण्याचे काम शिक्षकांनी करावे. शिक्षकांनी अभ्यासक्रमाच्या पलीकडे जाऊन शिकवले पाहिजे. विद्यार्थी सर्वव्यापी झाला आहे. इतिहास शिकवताना त्यातील पात्रांशी एकरूप होता आले पाहिजे. जगातील अनेक विद्यापीठे आगामी काळात भारतात येणार आहेत, आपली मुले स्पर्धेत टिकली पाहिजेत यासाठी शिक्षकवृंदांनी प्रयत्नशील राहावे , असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले.


तुकाराम पाटील , राजाभाऊ पाटील , सदाभाऊ पाटील व प्रा. मोटेगावकर या चौघांच्या हस्ते सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे स्वागत करण्यात आले. तर उपस्थित गुरुजनांचा त्यांच्या बसल्या जागेवर जाऊन सत्कार करण्यात आला. प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र या संकल्पनेच्या अनुषंगाने द्वारकादास शामकुमारच्या वतीने २ लाख कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात येणार आहे. त्या पिशवीचे लोकार्पणही सहकार मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



बाबासाहेब पाटील यांनी यावेळी बोलताना हा अतिशय आगळावेगळा कार्यक्रम असल्याचे सांगून भारतरत्न उद्योगपती रतन टाटा यांच्या पाऊलावर पाऊल टाकून चालण्याचे काम तुकाराम पाटील करत असल्याचे गौरवोदगार काढले. आपणास कार्यक्रम स्थळी पोहचण्यास विलंब झाला असला तरी सर्व कार्यक्रमाचा युट्युबवर आस्वाद घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. आमदार विक्रम काळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम पाटील यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. तुकाराम पाटील , राजाभाऊ पाटील , सदाभाऊ पाटील व प्रा. मोटेगावकर मोटेगावकर या चौघांच्या हस्ते सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे स्वागत करण्यात आले. तर उपस्थित सर्व गुरुजनांचा तुकाराम पाटील मित्रमंडळाच्या सर्व सदस्यांनी त्यांच्या बसल्या जागेवर जाऊन सत्कार केला. छत्तीसगड राज्य शासनाच्या वतीने गौरविण्यात आलेले डॉ. राम बोरगावकर, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक सौताडेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी केले . या सोहळ्यास शिक्षकवृंदांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

# मोदींची दूरदृष्टी: मिशन कर्मयोगी

सार्वजनिक प्रशासनाच्या क्षेत्रात भारत काहीतरी अभूतपूर्व करण्याचा प्रयत्न करत आहे. तो केवळ अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची पद्धतच नव्हे, तर त्यांच्या सेवा देण्यामागच्या उद्दिष्टातही बदल घडवून आणतो आहे. मिशन कर्मयोगी–नागरी सेवा क्षमता वृद्धीचा एक महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय कार्यक्रम. हा कार्यक्रमच या बदलाचे इंजिन आहे आणि त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीची छाप अगदी ठळकपणे दिसून येते. खरेतर, कोणत्याही सरकारचे नेतृत्व करण्याचा २५ वर्षांपेक्षा जास्त काळाचा आणि त्याचवेळी सार्वजनिक आयुष्याचा पाच दशकांपेक्षा जास्त काळाचा अनुभव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गाठीशी आहे. त्यामुळे तर ते खऱ्या अर्थाने या संपूर्ण व्यवस्थेचे कार्यान्वयक वाटतात, जुनाट निरुपयोगी प्रथा बदलण्यासाठीची एका सुधारकामधील अधीरता त्यांच्यात दिसते, महत्त्वाचे म्हणजे ते ध्रुवताऱ्याप्रमाणेच नागरिक प्रथम, विकसित भारत या सुस्पष्ट ध्येयाने वाटचाल करत आहे. मिशन कर्मयोगीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे हा काही केवळ वरवरचा मनुष्यबळ विकासातील सुधारणांचा उपक्रम नाही, तर हे अभियान म्हणजे मूल्यांवर आधारित, कामगिरीवर भर देणारे, भारताच्या नागरी सेवांसाठीचे एक परिवर्तनकारी पुनर्संरचात्मक अभियान आहे.
या कार्यक्रमांतर्गत तीन महत्त्वाचे निर्णायक बदल केले. पहिला हा सरकारी अधिकाऱ्यांच्या मानसिकतेतला आहे. या अंतर्गत आता ते स्वतःला कर्मचारी मानण्याऐवजी कर्मयोगी समजू लागतील. दुसरा हा बदल कामाच्या ठिकाणासंबंधीचा आहे. या अंतर्गत आता कामगिरीसाठी वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यापासून ते कार्यप्रणाली आणि व्यवस्थेतील अडथळ्यांचे शोध घेऊन ते दूर केले जातील. तिसरा महत्त्वाचा बदल हा सार्वजनिक मनुष्यबळ व्यवस्थापन व्यवस्थेत गतिशीलता आणण्याशी आणि संबंधित क्षमता विकास यंत्रणेशी संबंधित आहे. या अंतर्गत नियमांऐवजी भूमिकेला आधारभूत मानले जाईल. या नव्या संरचनेचे शिल्पकारही पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत आणि म्हणूनच तर २१व्या शतकातील शासनाच्या अपेक्षांच्या बाबतीतील त्यांच्या दूरदृष्टीतून ती नेमकेपणाने आखली गेली आहे. आधी मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून. मोदी यांनी एक संपूर्ण सरकार या संस्कृतीला चालना दिली. त्यांनी वेगवेगळ्या विभागांमधील अडथळे दूर केले. मंत्र्यांमध्ये विविध विषयांवर परस्पर विचारविनिमय करण्याबाबत आग्रह धरला आणि केवळ फायली पुढे सरकवण्याऐवजी व्यवस्थेवर आधारलेल्या उपाययोजनांना प्राधान्य दिले. हीच तत्त्वे आपल्याला कोरोना महामारीच्या काळात अनुभवायता आली. त्यावेळी सरकारचा प्रत्येक स्तर, उद्योग, नागरी समाज आणि नागरिक स्वयंसेवक या सर्वांनी आपण परस्पर भागीदारीतले एक राज्य असल्याच्या भावनेतूनच काम केले. याच सहकाऱ्याच्या मानसिकतेला गती–शक्तीसारख्या सुधारणांची जोड मिळाली असून, त्यामुळे त्याला संस्थात्मक स्वरूपही येऊ लागले आहे.



अधिकाऱ्यांनी एकत्र राहात पदांच्या स्तरातला फरक विसरून विचारमंथन करण्याची संस्कृती रुजवणारे गुजरातमधून सुरू झालेले चिंतन शिबिर आता केंद्र सरकारच्या धोरणांचा भाग बनले आहे. स्वतःचे ज्ञान आणि कौशल्ये सतत वृद्धिंगत करण्याबरोबरच, पंतप्रधान कार्यालयाचे अधिकारी ळत्रऋज्ञढ या डिजिटल व्यासपीठाचा वापर करतात की नाही, यावर त्यांचे जातीने लक्ष असते. दखल घ्यावी अशी बाब म्हणजे, समावेषकतेच्या अनुषंगाने ते संस्थात्मक स्मृतीला फारच गांभीर्याने घेतात. पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी लगेचच, आपल्या मंत्र्यांना अनेक दशके या व्यवस्थेत काम करत असलेल्या, आपापल्या सहाय्यक आणि कक्ष अधिकाऱ्यांकडून संबंधित विभागाच्या कामकाजांविषयी शिकण्याचा आग्रह धरला. प्रत्यक्ष वास्तव स्वरूपात एखाद्या कार्यसंस्कृतीत बदल होणे म्हणजे काय, याचेच हे ठळक उदाहरण आहे. दुसरीकडे, प्रत्यक्ष जमिनीवर घडून आलेल्या या सुधारणांचा कणा म्हणजे योग्य उद्देशाने केला गेलेला तंत्रज्ञान उपयोग. ळत्रऋज्ञढ–घरीरूेसळ व्यासपीठ ही या प्रयत्नांतर्गत एक सर्वसमावेशक, कधीही–कुठेही उपलब्ध होऊ शकणारी शिक्षण–प्रशिक्षण व्यवस्था आहे. या सुविधेअंतर्गत ३ हजारांहून अधिक पूर्व निश्चित वेळापत्रकीय नियोजनानुसार पूर्ण करता येतील अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. महत्त्वाचे म्हणजे ही सुविधा सर्वांसाठी उपलब्ध करून दिली गेली असल्याने, त्या माध्यमातून एकप्रकारे शिक्षणाचे लोकशाहीकरणच घडून आले आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून आत्तापर्यंत लाखो अधिकाऱ्यांना नवीन कायदेशीर चौकटींबाबतचे प्रशिक्षण दिले गेले आहे, या अंतर्गत सेवाभाव या उपक्रमाअंतर्गत देशभरातील लाखो पोलीस, डॉक्टर आणि इतर कर्मचारी नागरिकांसोबतच्या संवादात सुधारणा घडवून आणण्यासाठी आपली कौशल्ये अधिक वृद्धिंगत करू लागले आहेत, इतकेच नाही तर मोठ्या संख्येतील मनुष्यबळाने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेढ) यांसारख्या उद्योन्मुख तंत्रज्ञानामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केले.

एका अर्थाने या सगळ्यांतून पंतप्रधानांचे स्वतःचे तंत्रज्ञान स्नेहत्वाला प्राधान्य देणारे व्यक्तिमत्त्वच आता संस्थात्मक ताकदीत रूपांतरित झाले असल्याचीच प्रचिती येते.
या सगळ्यांइतकेच महत्त्वाचे आहे तो या कार्यक्रमाचा तात्त्विक गाभा. कारण मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून आपल्या प्राचीन नागरी संस्कृतीचे ज्ञान आधुनिक राज्यकारभाराशी जोडण्याचा ठोस प्रयत्न केला जातो आहे. त्यामुळेच तर या अभियानाअंतर्गत विकास, गर्व, कर्तव्य आणि एकतेसोबतच स्वाध्याय, सहकार्यता, राज्यकर्म आणि स्वधर्म यांसारख्या वैयक्तिक सद्गुणांना परस्परांसोबत जोडत अंतर्भूत केले गेले आहे. थोडक्यात ही काही केवळ स्मरणरंजनाची बाब नाही, तर हा उपक्रम म्हणजे क्षमतांना चारित्र्याचा आधार देण्याच्या उद्देशाने उच्च तंत्रज्ञानाच्या युगाला एका व्यावहारिक नितिमूल्यांची जोड देण्यासाठी केला जात असलेला ठोस प्रयत्न आहे. नागरिक केंद्रितता अर्थात जन भागीदारी हा या अभियानाचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ आहे. प्रत्येक सार्वजनिक निर्णयात नागरिकच केंद्रस्थानी असले पाहिजेत, यावर पंतप्रधान मोदी यांनी सातत्याने भर दिला. हाच त्यांच्या शासन व्यवस्थेचा मूलमंत्र आहे. या अंतर्गत धोरण आणि वितरण व्यवस्थेत लोकांची भागीदारी दिसून येते आणि मग त्याच अनुषंगाने अधिकारी देखील अगदी अखेरच्या व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी स्वतःची जडणघडण करतात. दुसरीकडे आत्मनिर्भरता अर्थात स्वावलंबित्व हे या सगळ्याला पूरक ठरणारे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले आहे. खरेतर आत्मनिर्भरता म्हणजे काही 'एकला चालो रे'ची भावना नाही, तर त्या उलट ती प्रत्यक्षात मुक्तपणा आणि जागतिक स्पर्धेने प्रेरित आपापल्या क्षमता आणि आपल्यातल्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. हाच दृष्टिकोन क्षमता निर्मितीच्या प्रयत्नांमधून आणि चू–त्र्ँ सारख्या व्यासपीठांच्या वाढत्या वापरामधून दिसून येतो. खरे तर या कार्यक्रमाच्या या संपूर्ण संस्थात्मक रचनेतून पंतप्रधान मोदी यांच्या व्यावहारिकतेचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. उच्चस्तरीय मार्गदर्शनासाठी पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील मनुष्यबळ विकास परिषद, समन्वयासाठी कॅबिनेट सचिवालय युनिट, क्षमता निर्माण आयोग (उइउ) संरक्षक आणि मानक निर्धारक आणि या सगळ्याचा कणा असलेल्या डिजिटल व्यवस्था आणि बाजारपेठांना चालना देण्यासाठीचे कर्मयोगी भारत नावाचे एक स्पेशल परपज व्हेहीकल (डझत) ही त्याचीच उदाहरणे आहेत. मुळात या संपूर्ण व्यवस्थेची संरचना म्हणजे शासनासाठी कुठूनही काम करून घेता येणारी सहकार्यपूर्ण, लेखा परीक्षण करता येण्याजोगी आणि परिणाम केंद्रित व्यवस्था आहे. महत्त्वाचे म्हणजे, भारत जे काही शिकत आहे ते स्वतःजवळच बाळगून बसत नाही. त्या उलट वसुधैव कुटुंबकम्च्या भावनेतून, सार्वजनिक प्रशासनात एक आदर्श निर्माण करण्याच्या उद्देशाने भारत, जे ज्ञान, अनुभव आणि साधने विकसित करतो आहे, ते सर्व सामायिक करण्यासाठीही सज्ज होतो आहे.
भारताचा हा दृष्टिकोन ग्लोबल साउथ अंतर्गत येणाऱ्या देशांसाठी खूपच महत्त्वाचा ठरला आहे, कारण तंत्रज्ञानातील बदलांमुळे आज अनेक देशांना क्षमतांसंबंधीच्या अशाच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळेच तर भारताने याबाबतीत मॉरिशसलाही या आधीच मदत देऊ केली आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून एखाद्या दूरदर्शी कल्पनेला एका व्यवस्थेत रूपांतरित केले जाते. या सगळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दीर्घकाळ शासन व्यवस्थेचा अनुभव, अडथळे दूर करण्याची त्यांची सहज प्रवृत्ती, तंत्रज्ञानासोबत सहजतेने जुळवून घेण्याचे त्यांचे कसब, संस्थात्मक स्मृतीबद्दलचा त्यांचा आदर आणि त्यांची नैतिकच्या अनुषंगाने त्यांचा समृद्ध शब्दसंग्रह याची जोड मिळाल्याने, संपूर्ण कार्यप्रणालीत एक अनुकरणीय व्यवस्थात्मक परिवर्तन घडून येते. म्हणूनच तर त्याच भूमिकेवर आधारित मनुष्यबळ विकास, डिजिटल व्यवस्थेबद्दलचे सातत्यपूर्ण शिक्षण, लोक भागीदारी आणि नागरी संस्कृतीवर आधारित तत्त्वांचा अंतर्भाव असल्याचे दिसून येते. खरे तर कोणत्याही शासन व्यवस्थेचे भविष्य कशा प्रकारे सुरक्षित केले पाहिजे याचे हे ठोस उदाहरण असल्याचे निश्चितच म्हणता येईल. भारत याच मार्गावर कायम राहिला तर नागरिकांना आपले ऐकणाऱ्या, सातत्याने शिकणाऱ्या आणि सेवा देणाऱ्या शासनाचा अनुभव मिळू लागेल आणि हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिज्ञेचा खरा गाभा आहे. म्हणूनच तर, गेल्या काही दशकांतील कोणत्याही एका प्रशासकीय सुधारणेपेक्षा मिशन कर्मयोगी हे मला सर्वाधिक महत्त्वाचे वाटते. कारण हे अभियान म्हणजे लोकांची सेवा करणाऱ्या लोकांमध्ये पिढ्यानपिढ्या होणारी एक ठोस गुंतवणूक आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सगळ्यांची आखणी–मांडणी–रचना ही यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य देणाऱ्या नेत्यानेच केली आहे.– डॉ. आर. बालसुब्रमण्यम्लेखक : केंद्र सरकारच्या क्षमता निर्माण आयोगाचे मनुष्यबळ सदस्य आहेत.

# साथींच्या आजारापासून नेहमीच मुलांना दूर ठेवा

गणपती उत्सवापूर्वी सुमारे पंधरा दिवस, गणपती उत्सवात कल्याण शहर, ग्रामीण भागाचे हवामान साधारण दमट होते. सध्याही ते तसेच असल्याने अधून मधून पावसाचा शिडकावा होतच असतो. त्याचा परिणाम शहराच्या आरोग्यावर झालेला दिसतो. बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचेच आरोग्य बिघडलेले दिसते. शहरात मलेरियाचे डास खूप मोठ्या प्रमाणावर झाले असले तरी कल्याण–डोंबिवली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून डास निर्मुलनासाठी कोणतीही परिणामकारक प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली दिसत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याची स्वत:च काळजी घेणे आवश्यक आहे.
कल्याण शहरासह ग्रामीण भागात पाण्यापासून होणाऱ्या आजारांचा धोका वाढला आहे. कल्याण महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालायाच्या सर्व केंद्रात सर्दी ताप व पावसाळी आजारावर भरपूर औषधे असल्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागाने दावा केला आहे. महापालिका रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांमध्ये श्रीमलंगपट्टी मुरबाड, शहापूर, भागातील रुग्ण अधिक आढळतात. कल्याण, उल्हासनगर व त्यांच्या भोवतालच्या ग्रामीण भागात थंडी–तापाचे रुग्ण आढळले असले तरी त्यात पाण्यापासून होणाऱ्या तापाची संख्या अधिक आहे. शहरातील खासगी रुग्णालयेही थंडी–तापाच्या रुग्णांनी भरलेली दिसतात, महापालिका व शासनातर्फेही नागरिकांनी थंडीताप आल्यास तो 'किरकोळ ताप' म्हणून अंगावर काढू नये.



किवा स्वत:च्या मनाने तापावरच्या गोळ्या घेऊ नयेत असे आवाहन केले आहे. त्याबरोबरच पावसात भिजू नये, ओले कपडे अंगावर वाळवू नये, डासांपासून संरक्षण मिळावे म्हणून घरात योग्य प्रमाणात जंतूनाशकाचा वापर करायला हरकत नाही. पण तो करताना लहान मुले त्यापासून दूर ठेवण्याची काळजी घ्यावी, मुलांच्या अंगात उबदार कपडे घालावेत. आजारी मुलांजवळ अन्य मुलांना जाऊ देऊ नये. त्यांचा संसर्ग झाला तरी मुलांना बाधा होऊ शकते.
काही दवाखान्यात मुलांसाठी जंतूनाशक औषधे, गोळ्या विनामूल्य मिळतात. त्यांचा वापर करण्यास हरकत नाही. सध्याच्या अतिपावसामुळे चिकनगुनिया, डेंग्यू, या तापाचे प्रमाण वाढले असल्याने मुलांना त्यापासून जपणे फार जरुरीचे आहे. विषाणू जन्य ताप असेल तर घशात खवखव होते, सर्दी खोकल्याने मुलं बेचैन होतात, त्यांना अशक्तपणा देतो. डेंग्यू, चिकनगुनियाच्या तापात रुग्णाला सतत उलट्या होतात, पोटात दुखते, खोकला येतो. दम लागतो. अशावेळी त्याला बाहेर जाऊ देऊ नये. घरातच झोपवून ठेवावे. वेळ न घालवता रुग्णालयात नेऊन औषधे द्यावीत.याप्रकारे सध्याच्या वातावरणात प्रत्येकानेच आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.–विनायक बेटावदकर

## आजारापासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स



हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.शरीराच्या मजबुती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हे जीवनसत्त्व उपयोगी आहे. त्यामुळे त्याचा डोस पुरेशा प्रमाणात घेणं गरजेचं आहे. **(क्रमशः)**

नाही होणार बाजूला!
जो प्राणी रहदारीत जेवढा जास्त अडथळा आणेल, तो तेवढा मोठा जनसेवक असतो...मी पण आहे!



## विनोद

**बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, ङ्गआई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही!फ आईने विचारले, ङ्गअरे वा. प्रश्न काय होता.फ शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!फ**

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार


प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.
– पु.ल. देशपांडे



**संस्कृत सुभाषित**
**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

## उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

## आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

## उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### खेळाचे मैदान असो वा युद्धाचे असो भारताचाच नेहमी विजय

**दिल्ली–** भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांची टीकेची झोड भारतीय क्रिकेटपटूंनी आशिया कपमध्ये पाकिस्तानला धूळ चारत शानदार विजय मिळवला. खेळाचे मैदान असो वा युद्धाचे मैदान असो भारताचाच विजय होतो. भारतीय सैनिकांनी 'ऑपरेशन सिंदूर' मधून पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खातमा करून त्यांना धूळ चारली, तसेच भारतीय क्रिकेटपटूंनी मैदानात पाकिस्तानला नामोहरम केले. पण संजय राऊत यांना मात्र भारताच्या या विजयाचे अतीव दु:ख झाले अशा शब्दांत भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी सोमवारी श्री.राऊत यांच्यावर टीकेची झोड उठवली. प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत–पाकिस्तान सामन्यावर फिक्सिंगचे आर–ोप करत ''मॅचवर आम्ही थुंकतो'' असं चीड आणणारे वक्तव्य करणाऱ्या राऊत यांचा श्री. बन यांनी खरपूस समाचार घेतला. यावेळी श्री. बन म्हणाले की, सामन्यातील भारताचा विजय हा देशाचा अभिमान आहे. त्यावर कालच्या सामन्यात दीड लाख कोटींचा जुगार खेळला गेला असे हीन आरोप राऊत यांनी केले. मुळात असे पोरकट, थिल्लर आरोप करण्यास श्री. राऊत यांची जीभ धजावते कशी? पाकिस्तानच्या विजयावर राऊत यांनी पैसे लावले असणार, त्यामुळे काल सट्ट्यात किती पैसे हरलात असे खोचकपणे विचारत श्री. बन म्हणाले की जर भारत हरला असता तर राऊत यांनी फटाके फोडून आनंद साजरा केला असता. पराक्रमी खेळाडूंनी पाकिस्तानला पराभूत केलंय आणि त्यावर श्री. राऊत हे थुंकण्याची भाषा करून खेळाडूंचा अपमान करत आहेत.

***

### 'पाकिस्तानविरुद्ध कुणालाच खेळायचे नव्हते, पण...'

दुबई –आशिया कपमध्ये टीम इंडियाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. टॉसच्या वेळी तसेच मॅच संपल्यानंतरही भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन केले नाही. टीम इंडियाच्या या कृतीमुळे पाकिस्तानला मात्र चांगल्याच मिरच्या झोंबल्या आहेत. भारतीय टीमने खिलाडूवृत्ती दाखवली नाही, असे म्हणत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मॅच रेफ्रीकडे याबाबतची तक्रार दाखल केली आहे. टीम इंडियाने ठरवून पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन केलं नसल्याचंही स्पष्ट झाले आहे.पहलगाम हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तान यांच्यातील संबंध अधिक ताणले गेले. भारताने पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट खेळू नये, अशी मागणी या सामन्याआधी मोठ्या प्रमाणावर केली गेली, पण तरीही भारत–पाकिस्तान यांच्यात सामना झाला. या सामन्यानंतर आता टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू सुरेश रैना याने स्पोर्ट्स तकसोबत बोल–ताना धक्कादायक दावा केला आहे. बीसीसीआयने स्पर्धेत सहभागी व्हायचा निर्णय घेतला, त्यामुळे खेळाडूंकडे खेळण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता, असं रैना म्हणाला आहे.
काय म्हणाला सुरेश रैना?'मला एक गोष्ट नक्की माहिती आहे. तर पाकिस्तानने युएईचा पराभव केला तर तेदेखील सुपर–४मध्ये प्रवेश करतील, त्यामुळे तिथेही भारत–पाकिस्तान लढत होईल. भारतासोबतच पाकिस्तानही फायनलला पोहोचली तर आशिया कप फायनलमध्येही भारत–पाकिस्तान समोरासमोर येतील.

***

### पाकिस्तानचे डोके फिरले, म्हणे– मॅच रेफरीची हकालपट्टी करा

दुबई–भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण राजकीय संबंध रविवारी आशिया कप २०२५ च्या सामन्यातही स्पष्टपणे दिसून आले. भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध ७ गडी राखून मिळवलेल्या विजयानंतर हस्तांदोलन करण्यास नकार देत 'मूक निषेध' नोंदवला. स्टेडियममधील या 'नॉन–क्रिकेटिंग' घटनेमुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड ने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद कडे धाव घेतली आणि सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना पदावरून हटवण्याची मागणी केली.सामन्यापूर्वी नाणेफेकीच्या वेळी पायक्रॉफ्ट यांनीच पाकिस्तानी कर्णधार सलमान अली आगा यांना भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्याशी हस्तांदोलन न करण्यास सांगितले होते, असा आरोप पीसीबीने केला आहे.पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी सोशल मीडियावर या घटनेची माहिती दिली. त्यांनी 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले की, आयसीसीच्या आचारसंहितेचे आणि खेळाच्या भावनेशी संबंधित एमसीसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पीसीबीने आयसीसीकडे तक्रार दाखल केली आहे. पीसीबीने सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना आशिया कपमधून तात्काळ हटवण्याची मागणी केली आहे. नक्वी हे एशियन क्रिकेट कौन्सिल चे अध्यक्ष देखील आहेत. त्यांनी पायक्रॉफ्टवर नाणेफेकीच्या वेळी केलेल्या भूमिकेमुळे आयसीसीच्या आचारसंहितेचे आणि एमसीसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. सामना अशाप्रकारे संपणे निराशाजनक आहे.

### इंडियाने हस्तांदोलन टाळले, पाकिस्तान चिडला; पीसीबीने दिला इशारा

मुंबई–आशिया चषकातील यंदाचा भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामना चांगलाच वादग्रस्त ठरला. सामना सुरू होण्याअगोदरपासून वादात असलेला हा सामना भारताने विजय मिळवल्यानंतरही वादग्रस्त ठरला आहे. टीम इंडियाने १५.५ षटकांत लक्ष्य गाठत पाकिस्तानचा दारुण पराभव केला. कर्णधार सूर्यकुमार यादवने षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. त्यानंतर, सर्वत्र जल्लोष सुरू झाला, पण सामना जिंकल्यानंतर प्रोटोकॉलप्रमाणे विरोधी संघातील सदस्यांशी हस्तांदोलन न करताच भारतीय फलंदाज मैदानातून बाहेर आल्याने वादंग उठलं आहे. आता, पीसीबी (झ्ण्) म्हणजेच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने थेट आयसीसीकडे तक्रार केली असून भारत–पाकिस्तान यांच्या साम न्यातील मॅच रेफरीची हकालपट्टी करा, अशी मागणी केली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने नो शेकहँड वादावरुन एसीसी आणि आयसीसीकडे भारतीय संघाची तक्रार केली आहे, पीसीबीने थेट सामन्याचे पंच अँडी पायक्रॉफ्ट यांच्यावर निशाणा साधत त्यांना आशिया चषकातून हाकलून देण्याची मागणी करण्यात आली आहे. अँडी पायक्रॉफ्ट यांची आशिया कपमधील मॅच रेफरी पॅनल लिस्टम धून हकालपट्टी करावी, अन्यथा आशिया चषक स्पर्धेतून पाकिस्तान आपलं नाव मागे घेईल, असा इशाराही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने दिला आहे. पायक्रॉफ्ट यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करत, टॉस फडकवत असताना भारत आणि पाकिस्तान संघाच्या दोन्ही कर्णधारांना हस्तांदोलन न करण्याच्या सूचना दिल्या. त्यावरुन, पीसीने नाराजी व्यक्त करत पंचांवर कारवाई मागणी केली आहे.

# हस्तांदोलन न केल्याबद्दल कारवाई होणार?

नवी दिल्ली: काल भारत आणि पाकिस्तान या दरम्यान दुबईत झालेल्या आशिया चषक २०२५ स्पर्धेत सूर्याच्या टीमने पाकड्यांवर ७ विकेट्सने विजय मिळवला. पहलगाम हल्ल्याची जखम ताजी असताना भारतीय संघाने पाकिस्तानसोबत खेळण्यावर अनेक भारतीयांनी विरोध दर्शवला होता. इतकेच नव्हे तर अनेकांनी या सामन्याचा निषेध देखील केला. मुळात सरकारच्या काही आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील धोरणांमुळे बीसीसीआयला भारत आणि पाकिस्तानला एकत्र खेळवावे लागले. असे असले तरी, टीम इंडियाच्या खेळाडूंनी सर्व भारतीयांच्या भाव–नेचा आदर केला. टीम इंडियाच्या खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं देखील टाळलं. ज्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. मात्र यामुळे, आता एक नवीन प्रश्न उपस्थित केला जातो आहे की, हस्तांदोलन न केल्यामुळे टीम इंडियावर आयसीसीकडून दंडात्मक कारवाई



करण्यात येणार की नाही?
दरम्यान, पाकिस्तानच्या टीम मॅनेजरने टीम इंडियाच्या एकाही खेळाडूने हस्तांदोलन न केल्याबद्दल भारताविरुद्ध 'औपचारिक निषेध' नोंदवल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता आयसीसीआय कोणते पाऊल उचलणार? आणि हस्तांदोलन करणे अनिवार्य असतेच का? असे प्रश्न साहजिकच दोन्ही देशांच्या क्रीडा चाहत्यांना पडला आहे.
खेळाचा नियम काय सांगतो?
क्रिकेटच्या नियमांनुसार, जर एखादा संघ सामन्यापूर्वी किंवा नंतर विरोधी संघातील खेळाडूंशी हस्तांदोलन करत नसेल तर तो गुन्हा ठरत नाही. हस्तांदोलन हा खेळ भावनेचा एक भाग मानला जातो. कोणत्याही संघाला किंवा त्यांच्या खेळाडूंना सामन्यादरम्यान त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशी हस्तांदोलन करण्यास भाग पाडले जात नाही. दोन्ही संघांचे खेळाडू सामन्यानंतर हस्तांदोलन करतात ही फक्त क्रिकेट संस्कृतीची बाब आहे. स्पर्धा ही खउउ ची असो, –उउ ची असो किंवा देशांतर्गत इतर कोणतीही असो, विरोधी संघाशी हस्तांदोलन करणं अनिवार्य नसते.
त्यामुळे पाकिस्तानशी हस्तांदोलन न केल्याबद्दल टीम इंडियावर कोणताही दंड आकारला जाणार नाही, कारण असं करणं क्रिकेटच्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन नाही.

# श्रीलंकेने बांगलादेशाला हरविले



अबुधाबी : आशिया चषक स्पर्धेतील सलामीच्या लढतीत तुल्यबल बांगलादेशाचा एकहाती पराभव करत श्रीलंकेच्या संघाने यंदाच्या हंगामात जेतेपदाच्या शर्यतीत आपली दावेदारी भक्कम केली. दुसरीकडे हाँगकाँगविरुद्धच्या लढतीत विजय मिळवून दुसर्या सामन्यातील एका पराभवामुळे बांगलादेशाच्या संघावर स्पर्धेतून आउट होण्याचे संकट घोंगावत आहे. आता अफगाणिस्तान विरुद्ध त्यांच्यासाठी 'करो वा मरो'ची लढत असणार आहे. जर हा सामना गमावला तर ते स्पर्धेतून बाहेर होतील.नुवान तुषारा अन् चमीराच्या भेदक मार्यानंतर हसरंगाने फिरकीत जादू दाखवून देत बांगलादेशाच्या फलंदाजीतील हवा काढली. संघ अडचणीत सापडल्यावर जाकर अली ४१ (३४) आणि शमीन हुसैन ४२ (३४) या जोडीनं सहाव्या बळीसाठी ८२ धावांची दमदार भागीदारी करत संघाच्या धावफलकावर १३९ धावा लावल्या. पण श्रीलंकेच्या संघानं १५ व्या षटकातील चौथ्याच चेंडूवर ६ बळी राखून सामना सहज खिशात घातला.
श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्याच षटकात नुवान तुषारा याने तंझीन हसनला क्लीन बोल्ड करत बांगलादेशाच्या संघाला पहिला धक्का दिला. दुसर्या षटकात चमीरानं परवेझ हुसैन इमॉनला तंबूत धाडले. संघाचे खातेही न उघडता दोन्ही फलंदाज तंबूत परतले. त्यानंतर कर्णधार लिटन दासनं दुहेरी आकडा गाठला. पण हसरंगाने २८ धावांवर त्याचाही खेळ खल्लास केला. तौहीद हृदोय ८ (९) आणि महेदी हसन ९ (७) स्वस्तात माघारी फिरल्यावर जाकर अली ४१ (३४) आणि शमीम हुसैन ४२ (३४) जोडी जमली. दोघांनी बळी न गमावता सहाव्या बळीसाठी ८६ धावांची भागीद–ारी करत निर्धारित २० षटकात संघाच्या धावफलकावर १३९ धावा लावल्या होत्या.
बांगलादेशाच्या संघानं दिलेल्या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. संघाच्या धावफलकावर फक्त १३ धावा लागल्या असताना कुसल मेंडिस अवघ्या ३ धावा करून माघारी फिरला. त्यानंतर सलामीवीर पथुम निसंका आणि कामिल मिशारा जोडी जमली. दोघांनी दुसर्या बळीसाठी ९५ धावांची भागीदारी रचत सामना श्रीलंकेच्या बाजूनं सेट केला. निसंकाने ३४ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५० धावा केल्या. दुसर्या बाजूला मिशारा ३२ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकार मारत ४६ धावांवर शेवटपर्यंत नाबाद राहिला.
आशिचा चषक स्पर्धेत 'ब' गटात 'सुपर फोर'मधील दोन स्थानांसाठी तीन संघात तगडी फाइट आहे. बांगलादेशाच्या संघाने पहिल्या दोन सामन्यातील एक सामना गमावला असून फक्त एकच सामना जिंकला आहे. साखळी फेरीत अखेरच्या सामन्यात त्यांच्यासमोर अफगाणिस्तानचे आव्हान असेल. हा संघ एका विजयासह सध्याच्या घडीला गुणतालिकेत सर्वात अव्वल आहे. त्यामुळे बांगलादेशासाठी पुढची लढत 'करो वा मरो'ची असेल. याउलट हा सामना गमावल्यावर अफगाणिस्तानला श्रीलंकेविरुद्ध पुनरागमनाची संधी असेल. दुसर्या स्थानावर असलेल्या श्रीलंकेसमोर हाँगकाँगच्या रुपात एक पेपर अगदी सोपा आहे.

### भारताच्या लंबोरियाने जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पटकावले सुवर्णपदक



**नवी दिल्ली:** भारताची प्रतिभावान बॉक्सर जैस्मिन लंबोरियाने जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. अंतिम फेरीत तिने पोलंडच्या पॅरिस ऑलिंपिकची रौप्यपदक विजेती ज्युलिया सेरेमेटाचा (र्गीश्रळर डूशीशार्शीर) ४–१ अशा मोठ्या फरकाने पराभव करून भारतासाठी स्पर्धेतले पहिले सुवर्णपदक जिंकले.
लिव्हरपूल येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत जैस्मिन पहिल्या राऊंडमध्ये थोडी पिछाडीवर होती. मात्र त्यानंतर तिने जोरदार पुनरागमन केले. याआधी उपांत्य फेरीत तिने व्हेनेझुएलाच्या कॅरोलिना अल्काला (उरीश्रळपर –श्रलर–श्रर) हिचा ५–० ने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. हा विजय तिच्यासाठी केवळ एक पदकच नव्हता, तर भारतीय महिला बॉक्सिंगसाठी एक मोठा टप्पा होता.याच स्पर्धेत भारताच्या नुपूर श्योराणने ८०+ किलो वजनी गटात आणि पूजा राणीने ८० किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले आहे, तर मीनाक्षी हुड्डा देखील ४८ किलो वजनी गटात पदक निश्चित करण्यात यशस्वी झाली आहे.

# आमचे क्रिकेटपटू फक्त आदेशाचे पालन करतात

दुबई : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया चषकाचा सामना रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळ–ला गेला. हा सामना वादात सापडला होता. कारण भारतीय चाहत्यांकडून या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी झाली होती. याचदरम्यान, दिग्गज क्रिकेटपटू आणि समालोचक सुन–ील गावस्कर यांनी स्पष्ट केले आहे की भारतीय संघ हा फक्त भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि सरकारच्या सूचनांचे पालन करत आहे. सामना होईल की नाही हे ठरविण्यात खेळाडूंची कोणतीही भूमिका नाही.
गावस्कर यांनी सांगितले की खे–



ळाडू फक्त आदेशांचे पालन करत आ–हेत. आणि पाकिस्तानविरुद्ध खेळण्याचा निर्णय बीसीसीआय आणि भारत सरकार सारख्या उच्च अधिकार्यांनी घेतल्याचे त्यांनी सांगितले. काही महिन्यांपूर्वी पहलगाम दहशतवादी हल्ला झाला. त्यामध्ये २६ लोक मारले गेले होते. प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तान आणि



पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतव–ादी तळांवर ऑपरेशन सिंदूरमार्फत हल्ला केला. त्यानंतर भारताने पाकिस्तानशी सर्व प्रकारचे संबंध तोडले होते. त्यामुळे आता हा क्रिकेट सामनाही भारताने खेळू नये, असे चाहत्यांचे मत आहे.
भारत विरूद्ध पाकिस्तान सामन्याबद्दलचा निर्णय हा शेवटी सरकारचा आहे. सरकार जो कोणताही निर्णय घेईल, त्याचे पालन खेळाडू आणि बीसीसीआयला करावेच लागते. वैयक्तिकरित्या तुम्हाला काय वाटतं याला काही महत्त्व नसतं. शेवटी, हा सरकारचा निर्णय आहे आणि या प्रकरणात त्याचीच अंमलबजावणी केली जात आहे. त्यामुळे खेळाडूंना यात दोष देणे योग्य ठरणार नाही, असे गावसकरांनी

### मृत्युमुखी पडलेल्या संतोषच्या पत्नीने सुर्यकुमारला सुनावले



डोंबिवली–भारताने आशिया कप २०२५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध ७ विकेट्सने शानदार विजय मिळवला. कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी हा विजय पहलगाम हल्ल्यातील बळींना समर्पित केला असला तरी, या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या संतोष जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे यांनी टीम इंडियाने हा सामना खेळायलाच नको होता अशी ठाम प्रतिक्रिया दिली आहे.

# हॉकी आशिया कपमध्ये भारतीय महिला संघ उपविजेता




अंतिम सामन्यात चीनकडून ४–१ ने पराभव
बीजिंग : महिला हॉकी आशिया कपमध्ये भारतीय संघ उपविजेता राहिला. हांगझोऊ येथे घरच्या मैदानावर चीनने भारताचा ४–१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. यासह चीनने महिला हॉकी विश्वचषकातही स्थान मिळवले आहे.अंतिम सामन्यात भारताकडून एकमेव गोल नवनीत कौरने पहिल्याच मिनिटाला पेनल्टी कॉर्नरद्वारे केला. दुसऱ्या क्वार्टरमध्ये चीनने पुनरागमन केले. ओउ जिक्सियाने गोल करून गुण १–१ असा बरोबरी साधली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये चीनच्या ली हाँगने गोल केला आणि २–१ अशी आघाडी घेतली. शेवटच्या क्वार्टरमध्ये चीनने आणखी २ गोल केले आणि सामना ४–१ असा जिंकला. महिला स्पर्धे पूर्वी पुरुष हॉकी आशिया कपचा अंतिम सामना ५ सप्टेंबर रोजी भारतात खेळला गेला. टीम इंडिया संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिली आणि विजेतेपद जिंकले आणि विश्वचषकासाठी पात्र ठरली. अंतिम सामन्यात भारताने दक्षिण कोरियाचा ४–१ असा पराभव केला होता.

# येणाऱ्या सर्व निवडणुकीत शतप्रतिशत भाजपा निर्माण करावा

# संघर्षातून पुढे आलेले रमेशआप्पांचे नेतृत्व

## भाजपा लातूर ग्रामीणच्या संकल्प मेळाव्यात खा. अशोकराव चव्हाण यांचे प्रतिपादन






**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण मतदार संघात धनशक्ती विरुद्ध सामान्य माणसाची शक्ती अशी लढाई झाली. या लढाईत जनतेनी साथ देवून रमेशआप्पांना निवडून देवून नवी क्रांती घडविली. संघर्षातून पुढे आलेले आप्पांचे नेतृत्व असून अशा नेतृत्वाला जनतेच्या प्रश्नाची, अडीअडचणीची जाण असते जनतेचे प्रेम आणि मेळाव्यास उपस्थित असलेली गर्दी पाहता हेच रमेशआप्पांचे बँक बॅलन्स आहे असे सांगून शत प्रतिशत भाजपा निर्माण करण्यासाठी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीला एकजुटीने सामोरे जा, जनता आपल्या सोबत आहे असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री भाजपा नेते खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नूतन ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील आणि शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा सत्कार आणि कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा खा. अशोकरावजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी लातूर येथील विश्वपॅलेस मंगल कार्यालयात संपन्न झाला. या मेळाव्यास राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे अध्यक्ष गोविंदअण्णा केंद्रे, माजी आमदार अमर राजूरकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, प्रदीप पाटील खंडापूरकर, विक्रमकाका शिंदे, रामचंद्र तिरुके, ऋषिकेश कराड, ओमप्रकाश गोडभरले, त्र्यंबकआबा गुट्टे, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, वैभव सापसोड, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, श्रीकृष्ण जाधव यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

मोदीजींनी जे बोलले ते करून दाखवले यामुळे त्यांचा देशात करिष्मा कायम आहे. देशाचे नेतृत्व मोदीच करू शकतात हे सिद्ध झाले असून असे नेतृत्व आजपर्यंत कधीही देशाला मिळाले नाही. राज्यात देवेंद्रजींच्या नेतृत्वातील सरकार चौफेर विकासाची प्रगती करत आहे. मोदीजींनी भारताच्या आणि देवेंद्रजींनी महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प केला, मराठवाड्याच्या पर्यायाने लातूर जिल्ह्याच्या विकासाचा आपण संकल्प करूया असे सांगून यावेळी बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, विरोधकाकडे कुठलाही मुद्दा नसल्याने दिशाहीन झालेल्या लोकांकडून मत चोरीचा आरोप करून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मत चोरी करण्याची गरज पडली असती तर अर्चनाताई पराभूत झाल्या असत्या का आणि २५० मतांनी नाना पटोले विजयी झाले असते का असा प्रश्न त्यांनी उपस्थित करून जनतेचा काँग्रेसवर विश्वास राहिला नाही जनता त्यांच्या सोबत राहायला तयार नाही. संपूर्ण मराठवाड्यात सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टीसाठी परिश्रम, मेहनत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपाची मजबूत सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

दोन वेळा पराभूत झालो म्हणून खचलो नाही आणि घेतलेला वसा खाली टाकला नाही. जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली, अश्रू पुसण्याचे काम केले यामुळेच मतदार संघात दहशतीचे वातावरण असतानाही माय माऊलीनी मोठा आशीर्वाद दिला याचा मला सार्थ अभिमान असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंनी मतदारसंघ विकत घेतला नसता तर देशमुखांची पाट तेंव्हाच लावली असती दहशतीच्या या मतदारसंघात बहाद्दर मतदारांनी मस्तवालाची मस्ती मतपेटीतून जिरवण्याचे काम केले आहे असे सांगून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा भाजपा पक्ष असून कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम पक्षात केले जाते. येत्या दोन-तीन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. लातूर महानगरपालिका जिंकणे हे आपले ध्येय असून भाजपाला शंभर टक्के यश मिळालेच पाहिजे रेणापूरसह लातूर पंचायत समितीवर भाजपची सत्ता आणण्यासाठी आतापासूनच सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन केले.

भाजपा लातूर जिल्ह्याचं अध्यक्षपद हे माझ्या जीवनातील आनंदाचा क्षण आहे. आज झालेला सत्कार हा अध्यक्षपदाचा व कार्यकर्त्यांचा सन्मान असून या सत्काराच्या माध्यमातून प्रचंड ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली याबद्दल रमेशअप्पा कराड यांना धन्यवाद द्यावेत तेवढे कमी आहेत. लातूर ग्रामीणमध्ये विजयी होवून रमेशअप्पा कराड यांनी वेगळा इतिहास स्थापन केला असल्याचे सांगून बसवराज पाटील म्हणाले की, लातूरकरांवर नांदेडचे पूर्वीपासून प्रेम आहे. लातूरची माणसे मोठी झाली ती केवळ नांदेडच्या आशीर्वादामुळे रमेशआप्पा तुमच्या माध्यमातून पुन्हा नांदेडकरांचा आशीर्वाद आपल्याला राहणार आहे. राज्यात देवेंद्रजींच्या नेतृत्वात विकासाची घोडदौड सुरू आहे सर्व घटकांना न्याय देण्याचे काम होत आहे तेव्हा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मेहनतीने काम करून शंभर टक्के विजय प्राप्त करूया असे बोलून दाखवले.

या कार्यक्रमात आ. अभिमन्यू पवार, पाशा पटेल, गोविंदअण्णा केंद्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करून भाजपाचे जिल्हाध्यक्ष यांच्या नेतृत्वात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एकत्रितपणे काम करून भाजपाला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. प्रारंभी नवनाथ भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शेवटी भागवत सोट यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या कार्यक्रमास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते महिला पुरुष मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पावसाळ्याचे दिवस असतानाही मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या कार्यक्रमास मतदार संघातील गावागावातून आलेल्या भाजपा कार्यकर्त्यांसह मतदार बंधू भगिनींनी प्रचंड गर्दी केली होती. त्यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून आली. मंगल कार्यालयातील मुख्य हॉलमध्ये जागा अपुरी पडत असल्याने तळमजल्यावरील सभागृहात उपस्थितसाठी अचानक पणे संयोजकांना स्क्रीनची व्यवस्था करावी लागली. दोन्ही मजल्यात तेवढीच गर्दी आणि बाहेर तशीच गर्दी दिसून येत होती. भाजपाचा विजय असो, देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो, अशोकरावजी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, रमेशआप्पा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. एकूणच या कार्यक्रमात प्रचंड उत्साह आणि जल्लोष दिसणारा भाजपचे ध्वज ठिकठिकाणी लावण्यात आले होते तर भाजपाच्या अनेक मान्यवर नेत्यांचे असंख्य भव्य कटाआउट कार्यक्रमाच्या परिसरात उभे करण्यात आले होते.

## तगरखेडा बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ७९ लाखांचा निधी मंजूर; माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या पाठपुराव्याला यश



**निलंगा/आयुब बागवान :** तालुक्यातील तगरखेडा येथील बंधाऱ्याला पाण्याची गळती लागल्याने गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. बंधाऱ्याच्या गेट्स व इतर यांत्रिक घटकांमध्ये झालेल्या बिघाडामुळे सिंचन साठा कमी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात होती. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून शासनाने तगरखेडा बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता तब्बल १ कोटी ७९ लाख ६६ हजार ७१५ रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या आदेशानुसार दि. ११ सप्टेंबर २०२५ तगरखेडा बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता मंजूर झालेल्या निधीचा उपयोग पुढील कामांसाठी केला जाणार आहे. लोखंडी गेट्स (०६) ची विशेष दुरुस्ती, यांत्रिक व विद्युत घटकांची देखभाल व बदल, सुरक्षित जलसाठा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या, तांत्रिक मान्यतेनुसार प्रशासकीय मंजुरीतील कामे, या मंजुरीनुसार एकूण कामाचा खर्च छ १,७९,६६,७१५ इतका असून त्यात यांत्रिक कामे, विद्युत कामे, विमा, जीएसटी व आकस्मिक खर्च यांचा समावेश आहे.

तगरखेडा बंधाऱ्यामुळे औराद-शहाजनी, निलंगा परिसरातील हजारो एकर शेतीला पाणीपुरवठा केला जातो. गळतीमुळे शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात सिंचनाच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. आता शासन मंजुरीमुळे बंधाऱ्याची गळती थांबून पाणी सुरक्षित राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना आधार मिळून उत्पादनात वाढ होणार आहे.

**आमदारांचा पुढाकार कौतुकास्पद....**

तगरखेडा व औराद शहाजनी परिसरातील शेतकरी बांधवांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

बंधाऱ्याच्या गळतीवर कायमस्वरूपी उपाय होऊन आमच्या शेतीला पाणीपुरवठा होणार आहे, हे आमच्यासाठी मोठे समाधान आहे, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या निर्णयामुळे तगरखेडा बंधाऱ्याचे आयुष्य वाढून पाण्याचा अपव्यय थांबणार असून, शेतकऱ्यांच्या जीवनात दिलासा देणारा बदल घडणार आहे.

## मुसळधार पावसाचा विमान सेवेला फटका

**पुणे/प्रतिनिधी :** शहरात रात्रभर विजांच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह कोसळणाऱ्या पावसाचा विमान सेवेला मोठा फटका बसला आहे. पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर रात्री बारा वाजल्यापासून सकाळी आठ वाजेपर्यंत पावसामुळे हवाई सेवा विस्कळीत झाली. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार असलेली १४ विमाने अहमदाबाद, हैदराबात, सुरत, मुंबई या विमानतळांवर उतरविण्यात आली, तर विमानतळावरून उड्डाण घेतलेली तीन विमाने पुन्हा माघारी जात विमानतळावर उतरली. वळिवण्यात आलेली सर्वाधिक सात विमाने हैदराबाद विमानतळावरच उतरविण्यात आली. मात्र, याचा प्रवाशांना फटका बसला असून प्रवाशांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

## वीज कंपन्यांतील अतांत्रिक अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरा

### एमएसईबी ऑफिसर्स असोसिएशनची मागणी




**लातूर/प्रतिनिधी :** महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही शासकीय वीज कंपन्यांमधील रिक्त असलेली अतांत्रिक अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरावीत, अशी मागणी एमएसईबी ऑफिसर्स असोसिएशनने तिन्ही कंपन्यांच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांकडे केली आहे.

प्रदीर्घ काळापासून महावितरण कंपनीत वेतनगट १ व २ मधील विधी, सुरक्षा व अंमलबजावणी, माहिती तंत्रज्ञान, वित्त व लेखा, मानव संसाधन, औद्योगिक संबंध, जनसंपर्क या संवर्गातील सरळसेवा/अंतर्गत प्रक्रियेद्वारे भरण्यात येणारी पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. ही पदे तातडीने भरण्याबाबत महावितरणचे संचालक (मासं) राजेंद्र पवार यांची असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी (दि.११ सप्टेंबर) प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. अतांत्रिक संवर्गाची पदे जवळपास मागील १० वर्षांपासून भरण्यात आलेली नाहीत, ही बाब असोसिएशनचे सरचिटणीस संजय खाडे यांनी संचालक (मासं) राजेंद्र पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. सदर प्रकरणी लवकरच योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

यासह सांघिक कार्यालय स्तरावरील अतांत्रिक संवर्गातील दीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेले पदोन्नती पॅनल लवकरात लवकर घेण्याची तसेच प्रतीक्षा यादीत असलेल्या अधिकाऱ्यांचे ३० सप्टेंबरपूर्वी पदोन्नती आदेश निर्गमित करण्याची विनंती पदाधिकाऱ्यांनी केली. याशिवाय पुणे येथील वाढती वीजग्राहक संख्या लक्षात घेता माहिती तंत्रज्ञान विभागाकरिता नव्याने रास्ता पेठ, पुणे येथे सॉफ्टवेअर सेलची निर्मिती करण्याची विनंती करण्यात आली. यासह अनेक प्रलंबित प्रश्नांचे निवेदन संघटनेच्या वतीने संचालक (मासं) यांना देण्यात आले. याच धर्तीवर महापारेषण व महानिर्मिती कंपनीमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवण्याबाबत निवेदन देण्यात आले. या प्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश लडकत, सरचिटणीस संजय खाडे, उपसरचिटणीस प्रणेश शिरसाट, केंद्रीय कोषाध्यक्ष प्रवीण गायकवाड व केंद्रीय सल्लागार गुलाबराव मानेकर उपस्थित होते.

## जयक्रांती महाविद्यालय कबड्डी मध्ये सर्वप्रथम



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या अ विभागीय आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांकाची ट्रॉफी पटकाविली आहे. यामध्ये एकूण १३ संघ सहभागी झाले होते. हे सामने बाद पद्धतीने खेळविण्यात आले होते. अनेक संघावर एकतर्फी विजय प्राप्त करत शेवटी प्रथम क्रमांकाची ट्रॉफी पटकाविली आहे. या विजेत्या संघात नितीन चव्हाण, अजय आडे, संदीप आडे, लखन राठोड, प्रदीप भगत, रितेश राठोड, संदीप राठोड, आशिष जाधव, आदित्य पवार, विशाल चव्हाण, मंगेश चव्हाण, कृष्णा राठोड, आणि शुभम चव्हाण इत्यादी सहभागी होते. या संघास क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेश कारंजकर व प्रा. शिवराज बाजूळगे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, अध्यक्ष बालाजीराव घार, प्राचार्य प्रशांतजी घार, प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे, संस्थेचे सदस्य पवन घार, अजित घार सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले आहे.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

**ई-निविदा (द्वितीय वेळ)**

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) महावितरण, लातूर मार्फत सं व सु मंडळ लातूर, उस्मानाबाद व बीड मधील विविध कामांकरिता T-22, T-23, T-25, T-26, T-28 / 2025-26 (2nd Call) साठी ऑनलाईन निविदा शासनाच्या योग्य त्या अधिकृत वर्गातील पंजीबद्ध व महावितरणच्या ई-टेंडरींगमध्ये नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून मागविण्यात येत आहे.

निविदा सूचना व निविदा प्रपत्र महावितरणच्या अधिकृत संकेत स्थळावर **दि.16.09.2025 ते दि.19.09.2025 रोजी 17.00 वाजता** पर्यंत उपलब्ध आहे. निविदा **दि. 20.09.2025 रोजी 13.00 वाजता** पर्यंत स्वीकारणेत येऊन तदनंतर **13.30 वाजता** शक्य असल्यास उघडणेत येईल. बयाना रक्कम सुद्धा ऑनलाईन भरणा करणेत यावी. बयाना रक्कम कार्यालयात भरणा घेतला जाणार नाही. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

**टीप:** जर विहित कालावधीत निविदा विकल्या गेल्या नाहीत तर सदरील निविदा विकण्याची कालावधी ऑनलाइनच वाढविण्यात येईल व त्याकरिता कोणतेही शुद्धीपत्रक वा निवेदन वर्तमानपत्रात पुन्हा प्रकाशित करण्यात येणार नाही. नोंदणीकृत एजन्सी यांनी या संबंधीच्या सूचना महावितरण कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी तपासणी करत राहावी.

**PRO No. (LZ) Latur 114/2025-26** **कार्यकारी अभियंता (स्था.), लातूर**



## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SYED MAHMOOD SYED BABU. TO:- MAHAMAD BABUMIYA SAYYAD. Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MAHAMAD BABUMIYA SAYYAD will used by my family husband /wife, children and relative.

**OLD NAME** :- SYED MAHMOOD SYED BABU.

**NEW NAME**:- MAHAMAD BABUMIYA SAYYAD.

**Address** :- AT POST. KINI YALLADEVI, TA. UDGIR, DIST. LATUR. 413518.

**Adhar no.**-322253985780.

**Mob. No.**-9764602549



**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजनांचा लाभ आता सीएससी केंद्रांतून

धाराशिव दि.१५ सप्टेंबर (जिमाका) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता त्यांच्या जवळच्या सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) केंद्रांमधून माफक दरात सेवा उपलब्ध होणार आहेत.याबाबतचा सामंजस्य करार (चजण) महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.विजयसिंह देशमुख व सीएससी केंद्राचे प्रमुख श्री.वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या करारानुसार लाभार्थ्यांना महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे,कागदपत्रे अपलोड करणे,अर्जाची सद्यस्थिती तपासणे तसेच आवश्यक मार्गदर्शन मिळवणे या सुविधा सीएससी केंद्रावर मिळतील.त्यामुळे जिल्हा ठिकाणी जाण्याची गरज राहणार नाही आणि लाभार्थ्यांचा वेळ व पैसा वाचणार आहे.

महामंडळाचे अध्यक्ष यांनी सांगितले की,या करारामुळे राज्यातील पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना जलदगतीने व पारदर्शकतेने पोहोचतील.कमी खर्चात घराजवळ सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन मिळून मराठा समाजातील तरुण उद्योजकतेकडे वळतील.

सध्या राज्यभरात ७२ हजारांहून अधिक सीएससी केंद्रे कार्यरत असून त्यांच्यामार्फत ङ्जख कागदपत्र,बँक कर्ज मंजुरी,हप्त्यांची माहिती इत्यादी अपलोड करण्यासाठी प्रत्येकी ७० रुपये शुल्क आकारले जाईल,अशी माहिती व्यवस्थापकीय संचालकांनी दिली.

या उपक्रमामुळे अनधिकृत एजंटमार्फत होणाऱ्या पैशांची उकळपट्टी थांबेल तसेच ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना मिळेल.भविष्यात लाभार्थ्यांसाठी मोबाईल ॲप व चॅटबॉटसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याचेही नियोजन आहे.

# संजय राजुळे यांना 'समाजरत्न पुरस्काराने' सन्मानित



नायगाव (विजय पिसे): मुक्ताई ग्रामीण बिगरशेती सह पतसंस्थेतर्फे सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांना 'समाजरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. समाजकारणाच्या माध्यमातून आरोग्यविषयी जनजागृती मोहिम राबविणारे एक धडपडे सामाजिक कार्यकर्ते अशी ओळख असलेले संजय राजुळे यांनी आपलं आरोग्य - आपली जबाबदारी, शैक्षणिक मदत, वृक्षलागवड, व्यसनमुक्ती व जैविक शेती या विविध उपक्रमात त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार दि.१४ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात आला.

राजुळे यांचे कार्य समाजातील सर्व घटकांसाठी प्रेरणादायी असून ग्रामीण व शहरी भागातील जनतेत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक धरणीधर बाबा कोळेकर (पो. स्टे. शिराढोण), सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सोमवंशी (एटीएस धाराशिव), रामचंद्र अनुरथ समुद्रे तसेच भारती साहेब (पोलीस स्टेशन, शिराढोण) आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला एक वेगळीच शोभा प्राप्त झाल्याचे चित्र यावेळी पहायला मिळाले. सुरुवातीला प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर स्वागत सत्कार, प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची मनोगतपर भाषणे झाली. उपस्थित सभासद, पालक व विद्यार्थ्यांनी आपली मते मांडून कार्यक्रमात रंगत आणली. सोबतच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ यावेळी पार पाडण्यात आला.

# शिक्षक हा ज्ञानदीप असला पाहिजे-डॉ.श्रीकांत येळेगावकर




धाराशिव (प्रतिनिधी)-शिक्षक हा ज्ञानाचा दिवा असला पाहिजे. त्याने काळाप्रमाणे आपले ज्ञान अद्ययावत ठेवायला हवे असे मत हि.ने. वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच आयोजित पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव प्रा.डॉ. शिवाजी शिंदे म्हणाले की, शिक्षकांनी भरपूर वाचन करावे. मुलांपुढे आपला आदर्श ठेवावा.त्यांनी कृती व वृत्तीत अंतर पडू देऊ नये

लेखक मंचाचे अध्यक्ष, फैय्याज शेख यांनी स्वागत करुन, प्रास्ताविक केले. रामकृष्ण अघोर,प्रा.अशोक म्हमाणे यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय करुन दिला. व्यासपीठावरील मान्यवरांचा सन्मान झाल्यानंतर, स्व. मोदीनाबी मीर इसहाक शेख, गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार सॉलेहा अजीम हफीज वडवान यांना, तर स्व.विजयकुमार हिराचंद शहा गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार अनिल काशिनाथ पाटील यांना, तसेच गुणवंत शिक्षक पुरस्कार नाजनीन बाशा कोरबू महेश रेवण कोटी वाले व संतोष शिवाजी हंपे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपल्या मनोगतातून वृत्तपत्र लेखक मंचच्या कार्याचा मुक्त कंठाने गौरव केला. सहकार्यवाह अरुण धुमाळ यांनी सर्व धर्मीय प्रार्थनेचे गायन केले. उपाध्यक्ष मयुरेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर कार्यवाह सुनील पुजारी यांनी आभार मानले.

सोलापूर सोशल महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास, कार्याध्यक्ष रंगसिद्ध कोरे,सदस्य अशोक खानापुरे,प्रा. गणेश लेंगरे, डॉ.रामचंद्र धर्म साले,ड. कमरुन्नीसा बागवान, अबेदा शेख,प्रा.धनंजय शहा,अजीम वडवान, बाबा शेख, साजिदा शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

# हाळदीचे एकुण २४० कट्टे ट्रकमधून गेले चोरीला

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जमीर खाजा शेख, वय ४० वर्षे, रा. वाकड काळाखडक ता. मुळशी जि. पुणे हे ट्रक मध्ये हाळदीचे एकुण २४० कट्टे पानकनेर ता. शेनगाव जि. हिंगोली येथुन सांगीलकडे ट्रक भरुन जात असताना अज्ञात व्यक्तीने दि. ३१.०८.२०२५ रोजी मनुष्यबळ पाटी ते येरमाळा जाणारे रोडवर पानगाव पाटीजवळ चालु ट्रक मधून ५ हाळदीचे कट्टे एकुण ३५,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी जमीर शेख यांनी दि.१४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# इतिहास हा जीवनाचा नंदादीप आहे - रामदास कोळगे



धाराशिव (शीला उंबरे-पेंढारकर) भविष्यात जीवन प्रकाशमान करण्यासाठी इतिहास महत्वपूर्ण भूमिका बजावत असतो. पाठीमागील काळात आपल्यातील देश भक्तांनी प्राण्याची आहुती दिली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हुतात्म्याचे स्मरण करणे आवश्यक आहे. घराची काळजी न करता आपल्या देश स्वातंत्र्य करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या परिश्रमाचे फळ आपल्याला मिळाले तो इतिहास आपण आठवला पाहिजे कारण त्याच इतिहासातून आपल्या जीवनात नंदादीप लावत असतो असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे यांनी केले. रुईभर ता.धाराशिव येथील जयप्रकाश विद्यालयाच्या प्रागंणात आज सोमवारी दि १५ रोजी स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ (आबा)कोळगे सोसायटी रुईभर संस्थेच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त खुल्या वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी श्री. कोळगे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बालविकास संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे यांची उपस्थिती होती

पुढे बोलताना ते म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामातील धाराशिव जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे आहे हैदराबाद संस्थानातील अन्याय , अत्याचाराच्या जुलमी राजवटीला बऱ्याच ठिकाणी विरोध होत होता. त्यात प्राणाची आहुती देत जे हुतात्मा झाले त्यांना आठवणीत ठेवून आपण आपले भविष्य उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वातंत्र्य सेनानी कै विश्वनाथ आबा कोळगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये धाराशिव जिल्हयाचे योगदान या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत एकूण २७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या सर्व विजयी स्पर्धकांना १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिना दिवशी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार आहे.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील लढ्याबद्दल स्पर्धकांनी त्यांच्या कार्याचा आढावा देत त्यांचे धाडस, अन्याय विरुद्ध लढण्याचा भाव सांगितला प्रत्येकानी जुलमी राजवटीला थारा न देता त्याचा विरोध करून जुलमी राजवटी विरोधी लढणारे लढवले खरोखरच समाजाला आदर्श बनले असे मत स्पर्धकांनी प्रकट केले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक कुमारी गुरव वसुंधरा संजय (समता कन्या प्रशाला धाराशिव), हिने पटकाविला द्वितीय क्रमांक कुमारी गिल्डा संजीवनी कांतीलाल, (धाराशिव )तर तृतीय क्रमांक जाधव अनुजा भगवान (श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल धाराशिव) हिने पटकावला तर चतुर्थ क्रमांक कुमारी ढोले श्रावणी बाबासाहेब (जयप्रकाश विद्यालय रुईभर) हिने मिळवला

तसेच जयप्रकाश विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्यातर्फे उत्तेजनार्थ बक्षिस म्हणून प्रत्येकी ५००/- रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहेत. यामध्ये .प्रथम यादव विद्या विक्रम, द्वितीय गायकवाड वैभवी पांडुरंग, तृतीय सुतार श्रद्धा ज्ञानेश्वर, तर उत्तेजनार्थ ढवळे वैष्णवी पद्माकर यांना १७ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहेत.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून विकास क्षिरसागर सचिन कांबळे, अभिजित घोळवे यांनी काम पाहिले

याप्रसंगी माजी ग्रा.पं. सदस्य राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे , कौशल्य विकास सहाय्यक , धाराशिव येथील संजय गुरव ,प्रशासकीय अधिकारी सौ.शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनय सारंग यांनी केले.

# पालकमंत्री प्रताप सरनाईक दोन दिवस धाराशिव जिल्ह्यात



धाराशिव र (जिमाका) परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १६ व १७ सप्टेंबर रोजी दोन दिवसाच्या जिल्हा दौऱ्यावर येत आहे.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

१६ सप्टेंबर रोजी दुपारी १:१५ वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून खाजगी मोटारीने तुळजापूरकडे प्रयाण. दुपारी २:१५ वाजता तुळजापूर येथे आगमन व शारदीय नवरात्र महोत्सव - २०२५ तुळजापूर येथील विविध स्थळाची प्रत्यक्ष पाहणी व आढावा बैठक मंदिर संस्थानच्या प्रशासकीय भवनात घेतील.सायंकाळी ५:३० वाजता श्री तुळजाभवानी मंदिर तुळजापूर येथून खाजगी वाहनाने शासकीय विश्रामगृह धाराशिवकडे प्रयाण.सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजतापर्यंत जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक व विश्रामगृह येथे मुक्काम.

१७ सप्टेंबर रोजी सकाळी ८:२५ वाजता शासकीय विश्रामगृह धाराशिव येथून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिवकडे प्रयाण.सकाळी ८:३५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे आगमन.सकाळी ८:४५ वाजता मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगण येथे उपस्थिती.सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून खाजगी वाहनाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडे प्रयाण.सकाळी १०:१० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथे आगमन व उम्मीद निदान केंद्र आणि रक्त साठवण केंद्राचे उद्घाटन करतील. सकाळी १०:५० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आगमन व ४५ मीटर ध्वज उभारणी कार्यक्रमाचे भूमिपूजन करतील.दुपारी १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून खाजगी वाहनाने छत्रपती संभाजीनगरमार्गे समृद्धी महामार्गाने ठाणेकडे प्रयाण करतील.

# मिरवणुकीत कायद्याचे पालन न करणाऱ्या पंधरा जणांवर कळंब पोलिसात गुन्हा दाखल

कळंब(प्रतिनिधी)-येथे मोहम्मद पैगंबर जयंती निम्मित काढण्यात आलेली जुलूस मिरवणुकीत कायद्याचं पालन न करणाऱ्या पंधरा जणांवर बीएनएस २२३ कलमाप्रमाणे कळंब पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मध्ये, बिलाल शखनूर बागवन रा.कळंब, प्रेम नवनाथ जाधव रा. चारोली ता.जि. पुणे, फरदिन सलामत पठाण रा.मोमीन गल्ली कळंब, राणा अजय सरवदे रा. दत्त नगर कळंब, मुजमिल हारुन शेख रा. चोंदे गल्ली कळंब, उमर अब्दुल रौफ शेख रा. चोंदे गल्ली कळंब, रिझवान जकीरद्दीन सिद्दीकी रा. कळंब, अभिषेक चव्हाण रा. सातारा, कैफ अफजल मिर्झा रा. पापडे गल्ली कळंब, साकीब जावेद शेख रा. गणेश नगर डिकसळ, सैफ शेख रा.कळंब , युनूस पाशुमिया शेख रा.संतोष नगर कात्रज पुणे, आबेद रफिक सय्यद रा.इस्लामपुरा डिकसळ, अब्दुल रब वहाब मणियार रा. डिकसळ, अक्षय अविनाश सिरसाट रा.तळेगाव दाभाडे ता.मंचर जि. पुणे यांचा समावेश आहे.

या मिरवणुकीत बंदी असताना डॉल्बी लावण्यात आलेली होती, या संदर्भात पत्रकार मुस्तान भाई मिर्झा यांनी सोशल मीडियावर सडेतोड भाष्य केल्यानंतर पोलिसांनी डॉल्बी बंद केली होती. दुसऱ्या दिवशी शहरातील नागरिकांनी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रारा दाखल केल्या नंतर हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या संदर्भात संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर ही गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन क्षीरसागर यांनी केली आहे.

# सिमेंट विट उद्योग दुकानाचे कुलूप तोडून केली चोरी

कळंब(प्रतिनिधी)- शहरातील दत्तात्रय विठ्ठल भराडे रा बाबानगर यांच्या सिमेंट विट उद्योग दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ४४ हजार रुपयाचा मुदेमाल चोरून नेहला.ही घटना शनिवार (ता. १३ ) घडली आहे. याप्रकारणी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, भराडे सिमेंट विट बनविण्याचा उद्योग आहे.अज्ञात चोरट्याने दुकानाचे कुलूप तोडून दुकानातील एक ट्रॅक्टरचे हायड्रोलिक ॲसेंबली, बोरचे ५० फुट वायर व सिमेंट वीट बनविण्याचे २५० लोखंडी प्लेट असा एकुण ४४ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेहला. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649